दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक २५ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.१५ नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (ढोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# वक्फ बोर्डाचा कायदा मंजूर करून घेणार:अमित शहा यांचा निर्धार

## निवडणुकीत राहुल नावाचे प्लेन क्रॅश होणार



**परभणी (वृत्तसंस्था)**
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची परभणी येथील जिंतूर येथे सभा पार पडली. यावेळी अमित शहा म्हणाले, जिंतूरवासियांना सांगायला आलोय. महाराष्ट्रातील सर्व विभागात जाऊन आलो. महाराष्ट्र विधानसभेचा निकाल पाहायचा आहे का? २३ तारखेला महाविकास आघाडीचा सुपडा साफ होणार आहे, महाराष्ट्रात मोदींच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार बनणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.अमित शहा म्हणाले, उद्धव ठाकरे यांना सांगायला आलो आहे. आघाडी सरकारने काय केले याची लिस्ट घेऊन या, जिंतूरकरांनो दहा वर्षांपर्यंत शरद पवार केंद्रात मंत्री होते, सोनिया-मनमोहन यांचे सरकार होते. १० वर्षात महाराष्ट्राला केवळ एक लाख ९१ हजार करोड रुपये मिळाले. मोदीजींनी १४ ते २४ मध्ये एक लाख ९१ हजार करोडच्या समोर दहा लाख पंधरा हजार कोटी रुपये विकास निधी दिला
पुढे बोलताना अमित शहा म्हणाले, जेवढा विरोध करायचा तेवढा करा. आम्ही डंके की चोट पे वक्फ बोर्डाचा कायदा मंजूर करून घेणार आहोत.
सोनिया गांधींनी वीस वेळा राहुल नावाचे प्लेन निवडणुकीत लँड करण्याचा प्रयत्न केला. मात्र निवडणुकीत तुमचा राहुल नावाचे प्लेन क्रॅश होणार आहे, हे लक्षात ठेवा. पुढे ते म्हणाले, हरियाणातही यांनी प्रयत्न केला, मात्र तिथेही आमचे सरकार आले, आता महाराष्ट्रातही महायुतीचे सरकार येणार.अमित शहा म्हणाले, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, की अशाच गोष्टी सांगा ज्या तुम्ही करू शकतात. आमचे मोदी हे प्रत्येक स्वप्न पूर्ण करू शकणारे नेते आहेत. महायुती सरकारने लाडक्या बहिणीची योजना आणली त्याला सुप्रिया सुळे आणि उद्धव ठाकरे विरोध करत आहेत, असेही अमित शहा म्हणाले.

### २५ लाख रोजगार देणार

**आश्वासनांचा पाढा वाचताना अमित शहा म्हणाले, आम्ही २५ लाख रोजगार देणार आहोत. ४५ हजार गावांमध्ये पक्के रस्ते बनवणार आहोत. वीज निर्मिती सोलारच्या माध्यमातून करणार आहोत. २० टक्के वीजेची बचत करणार आहोत. ५० लाख लखपती दीडी करणार आहोत. शिवाजी महाराजांनी जे किल्ले बांधले ते ऐतिहासिक आहेत. किल्ल्यांसाठी आम्ही एक प्राधिकरण करून २ हजार कोटी रुपये खर्च करणार आहोत. आम्ही सगळे आश्वासन पूर्ण करणार याची गॅरंटी मी देतो, असे अमित शहा म्हणाले.**

## नागपूरमध्ये पोलिसांनी १.३५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली,दुचाकी वरून घेऊन जात असताना कारवाई



**नागपूर । वार्ताहर**
राज्यात लागू असलेल्या आचारसंहिता कालावधीत पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. विविध ठिकाणी नाकाबंदी करून पोलिसांनी सुमारे ६०० कोटी रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये मुंबई, पुणे, नाशिकसह आता नागपूरमध्येही पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम जप्त केली आहे. बुधवारी मध्यरात्री तहसील पोलिसांनी एक मोठी कारवाई करत १ कोटी ३५ लाख रुपयांची रोकड जप्त केली.

**मोपेडवरून घेऊन जात होते रोख रक्कम**
तहसील पोलिसांना एक गोपनीय माहिती मिळाली होती की, एक व्यक्ती मोठी रक्कम घेऊन जात आहे. पोलिसांनी सापळा रचून मध्यरात्री सेंट्रल एव्हेन्यू रोडवर मोपेडवरून जाणाऱ्या दोन व्यक्तींना ताब्यात घेतले. या व्यक्तींमध्ये शाकीर खान आणि हाजी नासिर खान यांचा समावेश आहे. त्यांच्या ताब्यात असलेल्या बॅगेत १ कोटी ३५ लाख रुपयांची रोख रक्कम सापडली.

**पोलिसांची चौकशी सुरू**
पोलिसांनी या व्यक्तींच्या ताब्यातून जप्त केलेली रक्कम निवडणूक विभागाकडे सादर केली आहे. रक्कम नेमकी कोणाची आणि का आणली जात होती याबद्दल चौकशी सुरू आहे. या व्यक्तींचा दावा आहे की, त्यांनी ही रक्कम बांधकाम व्यवसायिकाकडे नेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी सर्व बाबींचा तपास सुरू केला असून, नागपूरमध्ये पहिल्यांदाच एक कोटी रुपयांहून अधिक रक्कम जप्त करण्यात आली आहे.
या कारवाईमुळे राज्यभरात पोलिसांची चौकशी आणि जप्तीची कारवाई अधिकच सखोल होण्याची शक्यता आहे.

## नागपुरात २५०० गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक;ठगबाज फरार



**नागपूर । वार्ताहर**
नागपूर शहरात अडीच हजार गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने दुप्पट पैसे आणि १० टक्के व्याज अशा आकर्षक ऑफरने हजारो लोकांना आकर्षित करत कोट्यवधी रुपये उचलले आणि कुटुंबासह फरार झाला. नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनेने गुंतवणूकदारांमध्ये खळबळ उडाली आहे.
आरोपी किशोर प्रभाकर अमृतकर (४५) याने बगडगंज परिसरात किराणा दुकान चालवित असताना, गेल्या काही वर्षांपासून लोकांकडून गुंतवणूक घेतली होती. सुरुवातीला त्याने दिवाळीसारख्या सणासुदीत गुंतवणूकदारांना रक्कम परत करून विश्वास संपादन केला होता. मात्र, यावर्षी अचानक घराला कुलूप लावून फरार झाल्याने फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी याप्रकरणी तातडीने गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेण्यासाठी पथक स्थापन केले आहे. आरोपीने एकूण १ कोटी ८५ लाख रुपये गोळा केल्याचे अनुमान आहे, आणि या फसवणुकीची संख्या वाढून २५०० हून अधिक गुंतवणूकदार प्रभावित होण्याची शक्यता आहे. या प्रकरणात आरोपीने घेतलेल्या रकमेचा पुढील तपास सुरू असून, त्याने ती रक्कम कुठे गुंतवली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे नागपुरातील गुंतवणूकदारांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मुकेश खन्ना पुन्हा 'शक्तिमान' बनले,पण सोशल मीडियावर ट्रोल होण्याचा सामना

**मुंबई । प्रतिनिधी**
'शक्तिमान', ज्याने १९९७ मध्ये लाखो बालकांचे हृदय जिंकले, त्याचा सुपरहिरो अवतार एक बारंवा उभा आहे. ६६ वयाचे मुकेश खन्ना पुन्हा शक्तिमानच्या गेटअपमध्ये दिसले असून, 'शक्तिमान रिटर्न्स' या नव्या प्रोजेक्टच्या अनुषंगाने त्यांनी याआधीच प्रेक्षकांना एक गोड धक्का दिला होता. पण, या अवतारात त्यांना पाहून नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर खिल्ली उडवली आहे.
काहींनी त्यांना वयस्कर रूप आणि बदललेल्या शारीरिक स्थितीवरून ट्रोल केले आहे, आणि त्यांच्या पुनरागमनावर टीकास्त्र सोडले आहे.



## नवनीत राणा यांनी अडसूळ पिता-पुत्रांवर तीव्र शब्दांत टीका केली



**अमरावती । प्रतिनिधी**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीतील नेत्यांना सावध करत, आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांना महायुतीत मिठाचा खडा टाकू नका असा इशारा दिला. मात्र, काही तासांमध्ये नवनीत राणा यांनी दर्यापूर मतदारसंघात युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रमेश बुंदिले यांच्या प्रचारसभेत सहभागी होऊन महायुतीतील नेतृत्त्वाला खुलं आव्हान दिलं.
नवनीत राणा यांनी शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे उमेदवार अभिजीत अडसूळ आणि माजी खासदार आनंदराव अडसूळ यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली. अडसूळ पिता-पुत्रांवर दीडफुट्या आणि चारफुट्या अशी उपमा देत, त्यांना दर्यापूर मतदारसंघाच्या विकासासाठी अयशस्वी ठरले असल्याचं सांगितलं. याशिवाय, त्यांनी अडसूळ यांना बाहेरचे पार्सल म्हणत परत पाठवले पाहिजे असं मत व्यक्त केलं.नवनीत राणा यांनी भाजपचे दुपट्टा घेत युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवार रमेश बुंदिले यांच्या पाठीशी उभं राहण्याची भूमिका स्पष्ट केली. त्याचवेळी त्यांनी दर्यापूर मतदारसंघातल्या राजकारणातील अपयशाबद्दलही कठोर शब्दांत टीका केली. त्यानंतर, नवनीत राणा यांनी अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यावरही टीका केली, विशेषत: अमरावती जिल्ह्यात घडलेल्या राजकीय घटनांचा संदर्भ घेत.



## वाकोदमध्ये २ लाखांचा गांजा जप्त;शेतकऱ्याला अटक

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**
कन्नड तालुक्यातील वाकोद येथे पोलिसांनी कारवाई करत १ लाख ९५ हजार ३६० रुपये किमतीचा गांजा जप्त केला असून, शेतकरी भाऊसाहेब नेमीनाथ जैन (४७) यांना अटक करण्यात आली आहे.
पोलिसांना वाकोद शिवारातील भाऊसाहेब जैन यांच्या शेतात गांज्याची लागवड केल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पिशोर पोलिसांनी बुधवारी (दि. १३) सापळा रचून धाड टाकली असता, कपाशीच्या शेतात गांज्याची झाडं आढळून आली.
या कारवाईदरम्यान पोलिसांनी कृषी मंडळ अधिकारी जगदीश सेन गायकवाड यांच्या मदतीने १ लाख ९५ हजार ३६० रुपये किमतीचा गांजा जप्त केला. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवाजी नागवे, पोलीस उपनिरीक्षक रतन डोईफोडे तसेच पोहेकॉ. विलास सोनवणे, किरण गंडे, परमेश्वर दराडे, वसंत पाटील, गंगाधर भदाणे, गजानन कऱ्हाळे, आणि पो.कॉ. अन्सार पटेल यांनी केली. भाऊसाहेब जैन यांच्यावर पिशोर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील कारवाईसाठी ताब्यात घेतले आहे

## सुरत महामार्गावर भीषण अपघात ट्रॅव्हलर बसला आग,एकाचा मृत्यू



**नागपूर । प्रतिनिधी**
नागपूर-सुरत महामार्गावरील काळसर गावाजवळ ट्रॅव्हलर बस आणि दुचाकीच्या धडकेत बसला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत एका प्रवाशाचा मृत्यू झाला आहे, तर इतर प्रवासी सुखरूप बाहेर पडल्याने त्यांचे प्राण वाचले. बस पूर्णतः जळून खाक झाली आहे.
घटनास्थळी मिळालेल्या माहितीनुसार, जळगावहून धुळ्याकडे जात असताना बस आणि दुचाकीची धडक झाली, त्यानंतर बसला आग लागली. या भीषण दुर्घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे; अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.तसेच, नागपूर शहरात काँग्रेस नेते नितीन राऊत यांच्या गाडीला बुधवारी रात्री ट्रकने मागून धडक दिली. सुदैवाने कार पलटली नाही, आणि चालकाने नियंत्रण राखल्याने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे

# घोराड येथे लाखो वातींचा जळणार त्रिपुर,पावणे दोनशे वर्षांची परंपरा जतन करत लाखो भाविक होतील सहभागी

**घोराड । प्रतिनिधी**

घोराड, जो विदर्भाची प्रती पंढरी म्हणून ओळखला जातो, येथे त्रिपुरारी पौर्णिमा निमित्त शुक्रवार, १५ नोव्हेंबर रात्री १२ वाजता लाखो वातींचा त्रिपुर लावला जाणार आहे. विठ्ठल रखुमाई देवस्थानात ही परंपरा पावणे दोनशे वर्षांपासून सुरू आहे. या परंपरेची सुरूवात संत केजाजी महाराजांनी केली होती. त्यांचे पुत्र संत नामदेव महाराज आणि त्यानंतर गावातील भाविकांनी ही परंपरा अखंड सुरू ठेवली आहे.

**पौर्णिमेला लाखो वातींचा त्रिपुर लावला जाईल**

गेल्या दोन शतकांपासून घोराड येथे त्रिपुरारी पौर्णिमेला मोठ्या प्रमाणात वाती लावण्याची परंपरा जपली जात आहे. पौर्णिमेला, घोराडचे भाविक आणि नागरिक प्रत्येक घरातून १०० ते १००० कापसाच्या वाती तुपात भिजवून मंदिरात आणतात. त्या वाती एकत्र करून, रात्री १२ वाजता विठ्ठल रखुमाई मंदिराच्या कळसावर त्रिपुर लावला जातो, जो एक भव्य आणि भक्तिपूर्ण दृश्य निर्माण करतो.

**कोजागिरी ते त्रिपुरारी पौर्णिमा कार्यक्रम**

कोजागिरी पौर्णिमा ते त्रिपुरारी पौर्णिमा दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. काकडा आरती, वन भोजन, आवळी पूजन यासारख्या पारंपारिक सोहळ्यांचा समावेश आहे. यामुळे घोराडमध्ये एक विशेष धार्मिक वातावरण निर्माण होत आहे. मोठ्या संख्येने भाविक या सोहळ्याचा भाग होण्यासाठी येथे येणार आहेत.

**नवीन कापसाच्या वातींचे महत्त्व**

त्रिपुरारी पौर्णिमेला लावला जाणारा त्रिपुर लाखो वातींच्या मदतीने साकारला जातो. या वाती प्रत्येक घरातून तयार केल्या जातात आणि प्रत्येक घरातील भाविक त्यांना तुपात भिजवून मंदिरात आणतात. याची संख्या लक्षाधीश वातीपर्यंत पोहोचते, जे घोराडच्या धार्मिक महत्त्वाचे प्रतीक ठरते.

**हरिनामाचा जयघोष**

शुक्रवारी रात्री १० वाजता हरिपाठ होईल, त्यानंतर भजनी मंडळी मंदिरात येतील. रात्री १२ वाजता टाळ-मृदंगाच्या गजरात त्रिपुर लावला जाईल. यानंतर भजनी मंडळी आणि भाविक मंदिराच्या परिकोटला प्रदक्षिणा पूर्ण करणार आहेत. या धार्मिक सोहळ्यामुळे त्रिपुरारी पौर्णिमेचा कार्यक्रम एक अद्भुत आणि भक्तिपूर्ण अनुभव ठरणार आहे.घोराडमध्ये होणारा हा धार्मिक सोहळा पाहण्यासाठी राज्यभरातून भाविक येथे येणार आहेत, आणि यामुळे घोराड एक धार्मिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून पुन्हा एकदा गाजणार आहे.



# दलित समाजाचं रक्षण करणारा एकमेव पक्ष भाजप-सुलेखा कुंभारे

**कामठी (नागपूर) । प्रतिनिधी**

मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या उपस्थितीत कामठी येथील जयस्तंभ चौकात भाजपचे कामठी-मौदा विधानसभा उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा आयोजित करण्यात आली. यावेळी माजी राज्यमंत्री सुलेखा कुंभारे यांनी भाजप पक्षाच्या कार्याबद्दल महत्वपूर्ण विधान करताना दलित समाजाच्या संरक्षणासाठी भाजपला एकमेव पक्ष ठरवले.



कुंभारे म्हणाल्या, आधी आम्ही दलित समाजाच्या हितासाठी भाजपला विरोध केला होता, परंतु आता लक्षात येतंय की भाजप हा जात, पात, धर्मभेद न मानता सर्व समाजाचे रक्षण करणारा एकमेव पक्ष आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आदर्श नेतृत्व आहेत, ज्यांनी कधीही जात-धर्माचा भेदभाव केला नाही. कुंभारे यांनी बावनकुळे यांच्या नेतृत्वाबद्दल मत व्यक्त करताना सांगितले की, कामठी विधानसभा क्षेत्राच्या विकासासाठी बावनकुळे यांना विधानसभेत पाठवणे आवश्यक आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली या क्षेत्राला समृद्धीची दिशा मिळेल.यावेळी भाजपचे उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे, आमदार टेकचंद सावरकर, अनिल निधान, अशोक हटवार, निशाताई सावरकर आणि इतर प्रमुख पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

# वैजापूर मतदारसंघात रस्त्यांची बिकट अवस्था;झोडे गावात आ रमेश बोरनारे यांची जन आशीर्वाद यात्रा फिक्की





**गंगापूर । प्रतिनिधी**

वैजापूर मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट बनली आहे. झोडेगाव येथे आयोजित आ. रमेश बोरनारे यांच्या जन आशीर्वाद यात्रेसाठी फक्त मोजकेच लोक उपस्थित राहिल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे. विशेषतः झोडेगावकडे येणारे चारही रस्ते पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले आहेत, यामुळे नागरिकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

झोडेगावात बोलताना आ. बोरनारे यांनी झोडेगाव ते गंगापूर रस्त्यासाठी साडेचार कोटी रुपये मंजूर झाले असल्याचा दावा केला. मात्र, या रस्त्याची दुर्दशा पावसाळ्यात अधिकच गंभीर झाली आहे. पावसाळ्यात खड्डे तात्पुरते भरले असले तरी, नागरिकांचे हाल थांबलेले नाहीत. वैजापूर मतदारसंघातील तब्बल ५३ गावांमध्ये रस्त्यांची हीच परिस्थिती असून, नागरिकांना मूलभूत सुविधांचा अभाव भासत आहे.मतदारसंघातील या समस्यांवर समाधान न मिळाल्याने आणि केवळ तीन हजार कोटींच्या कामांचा गाजावाजा केला जात असल्याने, स्थानिकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत एक्झिट पोल घेण्यावर आणि प्रसारणावर बंदी



**वर्धा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ च्या तरतुदीनुसार एक्झिट पोल घेण्यावर आणि त्यांचे प्रसारण करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. या बंदी आदेशानुसार, बुधवार १३ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७ वाजता ते बुधवार २० नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत कोणत्याही माध्यमाद्वारे एक्झिट पोल घेणे किंवा प्रसारित करणे मनाई असणार आहे.

निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ च्या कलम १२६ क च्या पोट-कलम (१) अंतर्गत या बंदीची घोषणा केली आहे. यानुसार, प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच अन्य कोणत्याही माध्यमातून एक्झिट पोल आयोजित करणे, प्रकाशित करणे किंवा प्रसारित करणे, यावर कडक निर्बंध असणार आहेत. निवडणूक आयोगाने या निर्णयाची सूचना संबंधित विभागांना केली असून, या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई होईल, असे कळविण्यात आले आहे.

यामुळे, २० नोव्हेंबरच्या विधानसभा निवडणुकीत मतदान होईपर्यंत कोणत्याही एक्झिट पोलचा निकाल जाहीर करणे, प्रसारित करणे किंवा प्रसिद्ध करणे पूर्णपणे बंदी असणार आहे.

# राजीव गांधी कन्या विद्यालयात बालदिन उत्साहात साजरा

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील राजीव गांधी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विंदा गजाननराव पालांदुरकर होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षक भगवान महाले उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात अनिल भांडारकर यांनी प्रास्ताविकाने केली. विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून सादरीकरण केले तसेच नेहरूंच्या जीवनकार्यावर भाषणे केली. प्रमुख पाहुणे भगवान महाले यांनी पंडित नेहरू यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा पालांदुरकर यांनीही नेहरूंच्या कार्याची माहिती दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन पद्मा भांडारकर यांनी केले तर आभार प्रदर्शन राहुळकर यांनी केले. कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम' गीताने करण्यात आली.

# पाटस ग्रामविकास फाउंडेशनकडून खेळणी विक्रेत्यांच्या मुलांना जर्किंग वाटप

**पाटस**-पाटस ग्रामविकास फाउंडेशनतर्फे नागेश्वर यात्रेच्या निमित्ताने खेळणी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांच्या गरजू मुलांना थंडीपासून बचाव करण्यासाठी जर्किंगचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात गुरुवारी, दिनांक १४ रोजी पाटस यात्रेमध्ये हे वाटप करण्यात आले. दरवर्षी सालाबादप्रमाणे हा उपक्रम राबवून, थंडीचा त्रास सहन करणाऱ्या विक्रेत्यांच्या मुलांना सहाय्य करण्यात येत आहे.



पाटस ग्रामविकास फाउंडेशन गेल्या दहा वर्षांपासून पाटस पंचक्रोशीत विविध सामाजिक उपक्रम राबवणारी प्रमुख संस्था म्हणून ओळखली जाते. संस्थेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग, शालेय साहित्य, शालेय फी, तसेच शाळा आणि परिसराच्या सुविधा उभारणे यांसारखे अनेक उपक्रम लोकसहभागातून राबविण्यात आले आहेत. यासह गावात घंटागाडी, तलाव खोलीकरण, एसटी पिकअप शेड यासारख्या विकास प्रकल्पांना ही संस्था पाठबळ देत आहे.

जर्किंग वाटप कार्यक्रमात फाउंडेशनचे संस्थापक विनोद कुरुमकर, मार्गदर्शक जुनेद तांबोळी, अध्यक्ष गणेश जाधव, उपाध्यक्ष गौतम पानसरे, सचिव गणेश शितोळे, कार्याध्यक्ष राज मुलाणी, खजिनदार प्रकाश भागवत यांच्यासह पाटस व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजू गोसावी व उपाध्यक्ष विठ्ठल वाळुंजकर उपस्थित होते.

# रवी राणा यांच्या वक्तव्यामुळे महायुतीत तणाव;अजित पवारांचे रवी राणा यांना टोमणे



**अमरावती । प्रतिनिधी**

महायुतीतील मित्रपक्षांवर केलेल्या वक्तव्यामुळे आमदार रवी राणा यांच्या विधानाने महायुतीत तणाव निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या प्रमुख नेत्यांनी राणा यांच्या विधानावर नाराजी व्यक्त केली असून, अजित पवारांनी रवी राणा यांना टोमणा मारला की, त्यांच्या बोलण्यामुळेच त्यांच्या पत्नीचा पराभव झाला.

रवी राणा यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना उद्देशून वक्तव्य करताना, अमरावतीत एखादी जागा कमी झाली तरी चालेल, पण जिल्ह्यात कमळ फुलले पाहिजे, असे विधान केले होते. या विधानामुळे महायुतीतील वरिष्ठ नेते नाराज झाले आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देत रवी राणा यांना इशारा दिला की, महायुतीत सर्व काही व्यवस्थित चालले आहे, कुणीही 'मिठाचा खडा' टाकू नये. शिंदे यांनी रवी राणा आणि नवनीत राणा यांना महायुतीत सामंजस्य राखण्याचे आवाहन केले. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या प्रकरणात रवी राणा यांना टोला मारत, फडणवीस यांना रवी राणा यांना समज देण्याचे सुचवले. त्यांनी असेही म्हटले की, लोक काहीबाही बोलत असतात, पण प्रत्येक गोष्टीवर प्रतिक्रिया देत बसायचं नसतं.रवी राणा यांच्या या वक्तव्याने महायुतीत तणाव निर्माण झाला असून, आगामी निवडणुकीत त्याचा प्रभाव कसा पडतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही : उपमुख्यमंत्री फडणवीस




**मूर्तिजापूर (अकोला) । प्रतिनिधी**

१३ नोव्हेंबर २०२४ - राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी महायुती सरकारने नेहमीच सकारात्मक पावले उचलली आहेत, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुर्तिजापूर येथे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही, असे ठामपणे व्यक्त केले. ते अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूर येथील प्रचार सभेत बोलत होते.

फडणवीस म्हणाले, गेल्या वर्षी कापूस आणि सोयाबीनच्या हमीभावापेक्षा कमी भाव मिळाल्याने शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले होते. त्यासाठी आम्ही भावांतर योजना आणली आणि शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांचे अनुदान दिले. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कमीत कमी भावातील फरक दिला. यापुढेही सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील आणि त्यांचे नुकसान होऊ देणार नाही.

उपमुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, कापूस आणि सोयाबीनच्या भावामध्ये फरक असेल, तर तो फरक सरकार शेतकऱ्यांना देईल. महायुती सरकार येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी देईल. तसेच, शेतकऱ्यांच्या सन्मान निधीमध्ये वाढ करून त्यांना पंधरा हजार रुपये दिले जाणार आहेत. कृषी पंपाचे बिल शेतकऱ्यांना माफ करण्यात आले आहे आणि सातबारा कोरा करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.महिला कल्याणावरही फडणवीस यांनी भाष्य केले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात महिला सशक्तिकरणासाठी विविध योजना राबविली जात आहेत. 'लाडकी बहीण योजना'सह 'लखपती दीदी' योजनेंतर्गत महिलांना आर्थिक मदत पुरवली जात आहे. विरोधकांनी या योजनांवर टीका केली होती, परंतु राज्य सरकारने ती यशस्वीपणे राबविली आणि महिलांचे खात्यात पैसे टाकून योजना यशस्वी केली. राज्य आणि देशातील विविध घटकांसाठी महायुती सरकार योजनांची अंमलबजावणी करत असून, मुलींच्या उच्च शिक्षणाचा खर्च सरकार करणार आहे. तसेच, नागपूर-मुंबई मार्गामुळे औद्योगिक विकासाला गती मिळाली आहे, वैनगंगा ते नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भातील सिंचन क्षेत्रात उल्लेखनीय वाढ होईल, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.सभेत भाजपा नेत्या चित्रा वाघ, खासदार अनुप धोत्रे, आमदार हरिष पिंपळे, वसंत खंडेलवाल, सुहासिनीताई धोत्रे, रावसाहेब कांबे यांच्यासह अन्य प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील महायुती सरकारला विजयी करण्याचे आवाहन केले.

# वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्रात होणार रंगतदार निवडणूक!

**भद्रावती । डॉ. यशवंत घुमे**

प्रशासनाने निवडणुकीची अद्ययावत तयारी केली आहे. निवडणुकीच्या कर्तव्यावर ज्यांची ड्युटी लागलेली आहे असे कर्मचारी तत्परतेने आपल्या कामात व्यस्त आहे. प्रशासन आपल्यापरीने निवडणूक निकोप वातावरणात होण्यासाठी योग्य ती काळजी घेत असली तरी प्रशासनाच्या डोळ्यात धुळफेक करून काही उमेदवारांच्या कार्यकर्त्यांकडून अनैतिक मार्गाचा वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून प्रशासनाने निःष्पक्ष निवडणूक होण्यासाठी सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. मतदार आपल्या पद्धतीने सतर्क आहेतच . आपल्या पसंतीचा योग्य तो आमदार निवडण्यासाठी नागरिकांनीही आपल्यापरीने तयारी सुरू केली आहे. वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रात यावेळी पक्ष आणि अपक्ष असे मिळून एकूण १८ उमेदवार उभे असल्याने यावेळेची निवडणूक रंगतदार होण्याची शक्यता राजकीय निरीक्षकांकडून वर्तवली जात आहे. यावेळेसच्या निवडणुकीचे वैशिष्ट्ये म्हणजे ज्यांना पक्षाकडून तिकीट मिळण्याची अपेक्षा होती. परंतु पक्षाने त्यांना उमेदवारी न दिल्याने अनेकांनी आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी कुठल्यातरी पक्षाचा आधार घेत तेथील उमेदवारी मिळविली. बंडखोरांच्या निवडणूकीत अनपेक्षित उभे राहण्याने आता मतविभाजन अटळ आहे.पक्षांच्या अधिकृत उमेदवारांना एकप्रकारचे ते चॅलेंज ठरणार आहे. हे बंडोबा किती प्रमाणामध्ये मते घेतात यावरच पक्षाच्या अधिकृत उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. मात्र यावेळी उमेदवारांपेक्षा बंडोबांच जास्त प्रभावशाली असल्याचे दिसतं आहे त्यामुळे अनेकांची झोप उडाली आहे. या क्षेत्राचा आमदार कोण बनणार? अशी चर्चा सर्वत्र होत असली तरी अजूनपर्यंत कोणाचीही खास अशी हवा न बनल्याने भावी आमदारांच्या संदर्भात नेमका वेध घेता येत नाही. प्रत्येक उमेदवार मीच आमदार होणार अशा अविर्भावात मतदारांना आपल्याकडे प्रभावित करीत आहे. ज्यांची १०० ही मते घ्यायची शाश्वती नाही अशीही मंडळी आपल्याच आमदारकीचा दावा करत असल्याने सामान्य मतदार संभ्रमात आहे. प्रत्येकजण आपापल्या समर्थक उमेदवाराचा आपापल्या पद्धतीने प्रचार करीत असून विजयाचे गणित जोडत आहे. कार्यकर्त्यांसाठी सार्वजनिक भोजनावळी सुरू असल्याचे सांगितले जात आहे.व खास कार्यकर्त्यांना विशेष असे महत्त्व दिले जात आहे . विशेष बैठका घेतल्या जात आहे. तरीही सामान्य मतदारांच्या मतांचा कानोसा घेतला असता अजूनपर्यंत कोणीही मतदारांना आपल्याकडे लुभाऊ शकले नाही. त्यामुळे कोणीच आजपर्यंत तरी आपल्या बाजूने विशेष हवा निर्माण करू शकले नाही. उमेदवार व त्यांचे कारभारी कार्यकर्ते मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी अनेक प्रकारचे डावपेच वापरत आहे. वरोरा आणि भद्रावती तालुक्यातील नागरिकांच्या चर्चा



ऐकल्या असता काही उमेदवारांच्या नावाने पैशाचा महापूर सुरू असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. हे जर खरे असेल तर धनाढ्य उमेदवारांपुढे सर्वसामान्य उमेदवार टिकू शकणार नाही. त्यामुळे निर्धन उमेदवारांचे भवितव्य धोक्यात राहणार आहे. निवडणुकीत पैसा हाच जर परमेश्वर ठरणार असेल तर यापुढे लोकशाही धोक्यात येईल. सर्वसामान्य माणूस कधीही आमदार बनण्याचा प्रयत्न करू शकणार नाही.आता जो उमेदवार पैसे देऊन आमदार होण्यासाठी मते मिळविण्याचा प्रयत्न करेल. पण पुढे तो त्या पैसे घेऊन मतदान करणाऱ्या विकाऊ मतदारांची इज्जत करणार नाही. म्हणून मतदारांनीही उमेदवारांच्या कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. पैसे वाटणारा उमेदवारांनीही मतदारांना गृहीत धरू नये. कामाच्या नावावर मते मागा ना. उगीच प्रलोभने कशाला दाखवता. अनेकांना या गोष्टी पटत नाही. परंतु त्याचे काही चालत नाही. त्यामुळे केवळ जे कानावर येते ते मुक्याने ऐकायचे एवढेच मतदार करू शकतो. शांतपणे ऐकत राहणे एवढेच त्याच्या हातामध्ये आहे. सध्या या क्षेत्रात कोणाची विजयाची गॅरंटी देता येत नाही. सगळेच आपापल्यापरीने प्रबळ उमेदवार आहे. या क्षेत्रातील मतदार जागृत आहे. तो कुठल्याही प्रलोभनाला बळी पडणार नाही व कुठल्याही आमिषाला जवळ करणार नाही असे एकंदरीत गावातील चर्चेवरून वाटते. ही चर्चा जर खरी असेल तर लक्ष्मी दर्शन देऊन पैसे वाटणाऱ्या उमेदवारांना विजयाकडे पोहोचणे सहज सोपे होईल असे वाटत नाही. सध्या उमेदवारांचा घरोघरी थेट संपर्क सुरू आहे. रॅली काढल्या जात आहे. सार्वजनिक सभांचे आयोजन केले जात आहे. जो तो आपापल्यापरीने मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. थेट भेटीतून उमेदवार आपल्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष ओळखी वाढवून लोकसंग्रह वाढवत आहे. मतदानाला अजून पाच दिवस बाकी असल्याने वेळेपर्यंत नेमकी कोणाची हवा होईल हे आत्ताच सांगता येत नाही.

या निवडणुकीत प्रामुख्याने अपक्ष उमेदवार मुकेश मनोज जिवतोडे ,प्रहार जनशक्ती पक्षाचे अहेतेशाम सदाकत अली, बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे प्रा. डॉ. जयवंत नथ्थुजी काकडे, वंचित बहुजन आघाडीचे अनील नारायण धानोरकर, भारतीय जनता पार्टीचे करण संजय देवतळे, इंडियन नॅशनल कॉँग्रेस पार्टीचे प्रवीण सुरेश काकडे, अपक्ष डॉ. चेतन गजानन खुटेमाटे,

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रवीण धोंडुजी सूर, बहुजन समाज पार्टीचे सागर अनिल वरघने, पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक)चे सेवकदास कवडूजी बरके, यांच्यासह अतुल ईश्वर वानकर, तारा महादेव काळे, प्रवीण मनोहर खैरे, मुनेश्वर बापुराव बदखल,राजू मारोती गायकवाड, विनोद कवडुजी खोब्रागडे ,श्रीकृष्ण घुमदेव दडमल, सुभाष जगन्नाथ ठेंगणे असे १८ उमेदवार उभे आहेत. यापैकी कोणाच्या पारड्यात जनता मते टाकणार यावर वरील उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. आपल्याकडे विजयश्री खेचून आणण्यासाठी सर्वच उमेदवार आपापल्यापरीने प्रयत्नरत आहे. रस्सीखेच सुरू आहे. तरी शेवटी ही निवडणूक आहे. जनता जनार्दन आहे. ते ठरवेल ते अंतिम आहे. केवळ मतदारांना विश्वासात घेणे हेच उमेदवारांच्या हातामध्ये आहे. ते त्यात किती प्रमाणात यशस्वी होतात हे लवकरच कळेल.

## मांगी तलावाचा कुकडी लाभक्षेत्रात समावेश करण्याचे आश्वासन-प्रा.रामदास झोळ यांचे जनतेला आवाहन







**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील मांगी तलावाचा कुकडी लाभक्षेत्रात समावेश करून कायमस्वरूपी पाणीपुरवठा, तसेच तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मताच्या रूपात आशिर्वाद देऊन निवडून द्यावे, असे आवाहन करमाळा-माढा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार प्रा. रामदास झोळ यांनी केले. पोथरे ता. करमाळा येथे आयोजित जाहीर सभेत त्यांनी हे विचार मांडले.

सभेला शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ कांबळे, कॉँग्रेसचे जिल्हा संघटक हरीभाऊ मंगवडे, वंचित आघाडीचे जिल्हाध्यक्ष साहेबराव वाघमारे यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. झोळ यांनी कुकडीचे हक्काचे पाणी मांगी तलावात सोडल्यास परिसरातील गावांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊन समृद्धी येईल, असे सांगितले. त्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती या क्षेत्रांमध्ये विकास साधण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला.

प्रा. झोळ यांनी मतदारसंघातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी कुकडी प्रकल्पातील पाणी मांगी तलावात वळवण्याचे आश्वासन दिले. त्यांनी शैक्षणिक संकुल उभारणे, मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल सुरू करणे, तसेच एमआयडीसीच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट व्यक्त केले. मराठा, ओबीसी, धनगर समाज बांधवांसाठी शैक्षणिक सवलती आणि आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावण्यासाठी झोळ यांनी काम केले आहे, असे साहेबराव वाघमारे यांनी सभेत सांगितले.सभेला शेतकरी, युवक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविक श्रीकांत साखरे-पाटील यांनी केले तर आभार गोपीनाथ पाटील यांनी मानले.

## करमाळा विधानसभा मतदारसंघात आमदार संजयमामा शिंदे यांची प्रचारात मुसंडी 'होम टू होम' प्रचाराचा उत्साह

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे यांच्या प्रचारात जोश वाढला आहे. आमदार संजयमामा शिंदे यांच्या पत्नी सौ. सविता शिंदे, मुलगी यशश्री शिंदे यांनी मतदारसंघात महिलांच्या मदतीने 'होम टू होम' प्रचारात योगदान दिले असून, मतदारसंघातील विविध गावांमध्ये प्रचाराची धुरा सांभाळली आहे.



करमाळा शहर आणि आसपासच्या छत्तीस गावांमध्ये संजयमामा शिंदे यांचे सुपुत्र यशवंत भैय्या शिंदे आणि सून गार्गी शिंदे यांनी देखील प्रचारात आघाडी घेतली आहे. माढा पंचायत समितीचे माजी सदस्य धनराज शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा शहरात पदयात्रा काढण्यात आली असून, मतदारांना संजयमामा शिंदे यांना विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मताधिक्य मिळवण्यासाठी संजय बापू घोलप, गणेश भाऊ चिवटे, नागेश दादा कांबळे, कन्हैयालाल देवी, प्रवीण आबा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांची टीम सक्रीय झाली आहे. 'होम टू होम' प्रचाराला भर देत शहरात सफरचंद हे चिन्ह घराघरांत पोहोचवण्यावर जोर दिला जात आहे. परवाच्या शक्ती प्रदर्शनानंतर या प्रचाराने वातावरणाला नवा रंग दिला आहे.

आमदार शिंदे यांनी गावभेट दौऱ्यांवर भर दिला असून, दररोज सायंकाळी सभा आणि दिवसभर कॉर्नर बैठका घेतल्या जात आहेत. नागेश कांबळे, मनसे तालुकाध्यक्ष संजय घोलप, आणि गणेश चिवटे यांच्या पाठिंब्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवीन जोश आला आहे. पदयात्रा आणि 'होम टू होम' प्रचाराला मिळत असलेल्या प्रतिसादाने नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. शहरातील प्रचार दौऱ्यात नागरिक संघटनेचे कन्हैयालाल देवी, विवेक येवले, माजी नगरसेवक प्रवीण जाधव, जगदीश अग्रवाल, रितेश कटारिया, अभिषेक आव्हाड, अशपाक जमादार, प्रफुल शिंदे, नाना मोरे, दिग्विजय घोलप, संगीता नष्टे आदी मान्यवर उपस्थित होते.

## आ.कानडे यांना तीन हजार कोटी रुपयांचा निधी देणार-उपमुख्यमंत्री अजित पवार

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

राज्यात महायुतीचे सरकार येणार असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे. श्रीरामपूर राहुरी मतदारसंघात लहू कानडे विजयी होतील. त्यांनी गत पाच वर्षांत १२०० कोटींची कामे केली होती. पुढील काळात त्यांना ३ हजार कोटी रुपये देऊ अशी ग्वाही, राज्याचे उमुख्यमंत्री अजित पवार यांनी देत श्रीरामपूरला गत वैभव प्राप्त करून देण्याचा वादा पवार यांनी दिला. महायुतीचे उमेदवार आ. लहू कानडे यांची उमेदवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मी स्वतः निश्चित केली होती. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचीही सहमती घेतली, अशी माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली.



आ. लहू कानडे यांच्या प्रचारार्थ शहरातील थत्ते मैदान येथे आयोजित केलेल्या जाहीर सभेत श्री. पवार बोलत होते. पक्षाचे राष्ट्रीय सचिव व प्रवक्ते अविनाश आदिक. माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक. देवळाली नगरपालिकेचे नगराध्यक्ष सत्यजित कदम., श्रीरामपूर तालुका देखरेख संघाचे अध्यक्ष इंद्रानाथ पाटील थोरात. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार. प्रदेश सरचिटणीस अरुण पाटील नाईक. तालुकाध्यक्ष कैलास बोर्डे. भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पटारे. अमृत काका धुमाळ. राष्ट्रवादी युवकचे प्रदेश सचिव फारुख पटेल. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मिस्टर शेलार. सदस्य शरद नवले. बाजार समितीचे माजी सभापती नानासाहेब पवार. उपसभापती अभिषेक खंडागळे,, माजी नगरसेवक रवींद्र गुलाटी, राजेश अलघ, राजेंद्र पवार, प्रकाश ढोकणे, सलीम शेख, मोहम्मद शेख, मुख्तार शहा, मेहबूब कुरेशी, भाऊसाहेब मुळे, जितेंद्र छाजेड, विजय शेळके, रवी पाटील, अल्तमश पटेल, मल्लू शिंदे, माजी नगरसेविका अर्चना पानसरे, स्नेहल खोरे, संगीता शेळके, आदिवासी संघटनेचे शिवाजी गांगुर्डे, रिपब्लिकन पक्षाचे सुरेंद्र थोरात, भीमा बागुल, सुभाष त्रिभुवन, उद्योजक अंकुश कानडे, आदींसह मान्यवर उपस्थित होते माजी नगरसेविका जयश्री शेळके विजय शेळके यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये पक्ष प्रवेश केला.अजित पवार म्हणाले, आपण शिव,शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा मानतो. किमान कार्यक्रमावर महायुतीतील तीनही पक्ष सोबत आहोत. लाडक्या बहिणींना मदतीचा निर्णय घेतला. त्यावर विरोधकांनी तिजोरी खाली झाल्याची टीका केली. बहिणींना दिलेली दिवाळीची भेट पुढची पाच वर्षे सुरू राहणार आहे. आ. कानडे हे उच्च शिक्षित आहेत. त्यांची पत्नी, मुलगा, मुली हे यशस्वी कारकीर्द गाजवत आहेत. प्रशासकीय सेवेचा त्यांना दांडगा अनुभव आहे. हागणदारी मुक्त गाव योजनेचे ते जनक आहेत. अतिशय बिकट आर्थिक स्थितीतून पुढे आलेला हा संवेदनशील लेखक आहे. त्यामुळे कॉँग्रेस पक्षाने कानडे यांची उमेदवारी कापली. मात्र या उमद्या कार्यकर्त्याच्या मागे मी भक्कमपणे उभा राहिलो.श्रीरामपूर मतदारसंघात देवळाली प्रवरा हे माझे आजोळ आहे. श्रीरामपूरला लहानपणी चित्रपट पहायला यायचो. येथील आर्थिक सुबत्ता जवळून अनुभवली आहे. महायुतीच्या सरकारमध्ये लहू कानडे यांच्या माध्यमातून श्रीरामपूरला गतवैभव प्राप्त करून देण्याचे वचन पवार यांनी दिले.लाडकी बहीण योजना पुढील पाच वर्षे सुरू राहणार आहे. महायुती सरकारला लाडक्या बहिणींची काळजी आहे. योजनेत भरीव वाढ करणार आहे, अशी ग्वाही अजित पवार यांनी दिली-महायुतीचे भाऊसाहेब कांबळे यांच्यासाठी आयोजित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा मी रद्द केली. मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मी स्वतः कानडे यांची उमेदवारी निश्चित केली. कांबळे हे आजारी वगैरे नसून ते ढोंग करत आहेत. मुख्यमंत्र्यांच्याच सभेसाठी उभारण्यात आलेल्या मंडपात आज सभा होते, महायुतीकडून मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यकर्त्यांना स्पष्ट आदेश आहेत. यावरून सर्व काही स्पष्ट होते. कानडे हेच अधिकृत उमेदवार असून त्यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन अजित पवार यांनी केले. असे अजित पवार म्हणाले.आ. कानडे म्हणाले, पाच वर्षापूर्वी कॉँग्रेसला उमेदवार नसल्याने त्यांनी उमेदवाराची गळ घातली. मायबाप जनतेने विश्वास दाखवून मला आमदार केले. ती जबाबदारी समजून आपण राजकीय गट गट. पक्ष असा भेदभाव न करता विकास कामांसाठी निधी दिला. तालुक्यात बाराशे कोटी रुपयांची विकास कामे केली. परंतु कपट कारस्थान करून आपली उमेदवारी नाकारण्यात आली. त्यानंतर अजित पवार यांनी संपर्क करून मुंबईला बोलावले. दुसरा फोन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचा आला. श्री. पवार यांनी मुख्यमंत्री अमित शहा, श्री. विखे यांच्यासह वरिष्ठ नेत्यांची चर्चा करून आपल्याला उमेदवारी दिली. माजी आमदार चंद्रशेखर कदम व नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी मेळावा घेऊन पाठिंबा दिला. रिपब्लिकन पक्षाचे नेते खासदार रामदास आठवले यांनीही पाठिंबा दिला. त्यामुळे आपला विजय निश्चित असल्याचे मी मानतो, असे ते म्हणाले.यावेळी राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पटारे, अमृत काका धुमाळ, देवळालीचे नगराध्यक्ष सत्यजित कदम, माजी नगरसेवक राजेंद्र पवार, फारूक पटेल यांची भाषणे झाली. यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेसचे राज्य कार्यकारणी सदस्य सुनील थोरात, शहराध्यक्ष अभिजीत लिप्टे, संदीप चोरगे, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष साजिद मिर्झा, सैफ शेख, भाजपाचे विधानसभा समन्वयक नितीन दिनकर, केतन खोरे, गणेश राठी, मारुती बिंगले, गिरीधर आसने, गणेश मुद्गुले, बाबासाहेब चिडे, नानासाहेब शिंदे, राधाकृष्ण आहेर, भाऊसाहेब बांद्रे, अजित चव्हाण, सुधीर टिक्कल, शहाजी कदम, रमेश घुले, पी. एस. निकम, रवी गायकवाड, सचिन ब्राह्मणे, सागर कुऱ्हाडे, संपत चितळकर, चांगदेव देवराय, योगेश जाधव, अशोक गागरे, शामराव निमसे, कोंडीराम विटनोर, राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या महिला तालुकाध्यक्ष मंदाताई गवारे, सरपंच मंजुश्री ढोकचौळे, पुष्पलता हरदास, रमा धिवर, मनीषा थोरात, सीमा पटारे, सतीश बोर्डे, सचिन जगताप, सरपंच अशोक भोसले, सागर मुठे, हरिभाऊ बनसोडे, आबा पवार, सुरेश पवार, राजेंद्र औताडे, रमेश आव्हाड, दीपक कदम, राधाकृष्ण तांबे, अक्षय नाईक यांच्यासह राष्ट्रवादी कॉँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष यांच्यासह महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केजची सभा मनसे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांनी गाजवली

### राज ठाकरे यांनी जनतेला फोनद्वारे केले संबोधीत




**केज । प्रतिनिधी**

दिनांक १४ नोव्हेंबर रोजी केज येथे राज ठाकरे यांची जाहीर सभा होती पण हेलिकॉप्टर मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे सभेला उपस्थीत राहु शकले नाहीत तरी पण त्यांनी जनतेला फोन कॉल द्वारे संबोधित केले व म्हणाले की,काही तांत्रिक कारणा मुळे मी सभेला येऊ शकलो नाही तरी आमचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना विजयाचा गुलाल लावा नंतर आम्ही केज मध्ये येऊन तुमची भेट घेणार आहे तसेच केज विधानसभा मतदार संघाच्या विकासात काही कमी पडू देणार नाही राज साहेब ठाकरे यांचे विचार ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने मनसे सैनिक उपस्थित होते.यावेळी रमेश तात्या गालफाडे यांनी जनतेला संबोधन केले व म्हणाले की आज पर्यंत केज विधानसभेचा विकास विरोधकांनी काहीच केलेला नसून मला एकदा संधी द्या केजचा विकास करूनच दाखवितो. विरोधी पक्षाच्या दोन्ही आमदाराने कमिशन खाऊन जनतेची फसवणूक केलीआहे व एकही उद्योगधंदा आणलेला नाही. बेरोजगारी वाढली असुन कॉलेज संस्था आणल्या नाहीत, शेतकऱ्यांना वीज नाही,पाणी नाही अशा मूलभूत सुविधा सुद्धा उपलब्ध नाहीत मी गेली वीस वर्षे जनतेची सेवा करत आहे मी सर्व सामान्य कार्यकर्ता असून असून राज साहेबांनी माझ्यावर जनतेची सेवा करण्यासाठी मला उभे केले आहे तरी मला एकदा संधी देऊन पहा मी या केज विधानसभेच्या कायापालट करुन दाखवणार आहे.बेरोजगारांना काम, शेतकऱ्यांच्या मालाला दाम मिळवून देणे ही माझी प्राथमिकता राहील विरोधकांनी हिंमत असेल तर मीडिया समोर येऊन जनतेला विकास काय केला आहे हे सांगावे. विरोधकांनी गुत्तेदारां कडुन कमिशन खाऊन स्वतःची घरे भरली आहेत फक्त मला आणि राज साहेब ठाकरे यांना शेतकऱ्यांसाठी, बेरोजगारांसाठी खूप काही करायचे आहे याची ब्ल्यू प्रिंट आम्ही तयार केली असून जनतेने आम्हाला एकदा संधी देऊन पहावी असे आवाहन त्यांनी जनतेला केले.त्याच बरोबर अर्चनाताई भोर यांनी सुद्धा सभेला आलेल्या जनतेला संबोधित केले जनतेचे मने जिंकले.जिल्हाध्यक्ष सुमंत धस,उपाध्यक्ष कल्याण केदार यांनी जनतेला आवाहन केले की,रमेश तात्या गालफाडे यांना प्रचंड बहुमतीने विजयी करा व महाराष्ट्र नवनिर्माणसेनेचा भगवा फडकवा मग आम्ही विकास करूनच दाखवितो असे त्यांनी सांगुन मनसे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना प्रचंड बहुमताने निवडूनआणण्या साठी सर्वांनी मतदानरुपी आशिर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

# मतदानासाठी कर्मचाऱ्यांना द्वितीय प्रशिक्षण संपन्न

**पाथर्डी । प्रतिनिधी**

शेवगाव विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या १६०२ केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना द्वितीय प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणासाठी २१ कर्मचारी गैरहजर होते. या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस काढून लोकप्रतिनिधित्व अधिनियम कायद्यानुसार कार्यवाही प्रास्तावित करण्यात आली आहे. प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या १३६५ कर्मचाऱ्यांचे टपाली मतदान करून घेण्यात आले.

शेवगाव विधानसभा मतदारसंघातील ३६८ केंद्राकरिता ४०८ मतदान केंद्राध्यक्ष १२२५ मतदान अधिकारी नियुक्ती करण्यात आलेले होते. या कर्मचाऱ्यांना शेवगाव शहरातील त्रिमूर्ती हायस्कूल मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद मते यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी ३९६ मतदान केंद्राध्यक्ष तर १२०६ मतदान अधिकारी असे १६०२ कर्मचारी प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. गैरहजर असलेल्या बारा मतदान केंद्राध्यक्ष व १९ मतदान अधिकारी अशा ३१ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस काढून लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये कार्यवाही प्रास्ताविक करण्यात आली आहे.






प्रशिक्षण वर्गात उपस्थित सर्व मतदान केंद्राध्यक्ष यांना मतदानाच्या दिवशी करावयाची कार्यपद्धती, ईव्हीएम व व्ही व्ही पॅड हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच उपस्थित मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे टपाली मतदान करून घेण्यात आले. त्याकरिता चार टपाली मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. त्यात १३६५ मतदान झाले आहे.

या प्रशिक्षण वर्गास अपर जिल्हाधिकारी शिर्डी बाळासाहेब कोळेकर यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद मते, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत सांगडे, उद्धव नाईक, विजया घाडगे, दिग्विजय पाटील, गौरी कट्टे आदी अधिकारी उपस्थित होते.

## वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन;दोन कोटींची थकबाकी परत मिळवण्याची मागणी

**वैजापूर । प्रतिनिधी**

स्थानिक कांदा मार्केटमधील सागर राजपूत या व्यापाऱ्याकडे शेतकऱ्यांची दोन कोटींपेक्षा अधिक थकबाकी असल्याने शेतकऱ्यांनी वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. व्यापाऱ्याकडून पैसे परत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी समितीचे सभापती रामहरी बापू जाधव व संचालक संजय पाटील निकम यांच्याकडे तक्रार केली आहे.






सभापती रामहरी जाधव व संचालक संजय निकम यांनी शेतकऱ्यांना दिलासा देत सांगितले की, शेतकऱ्यांचे पैसे बुडणार नाहीत. बाजार समिती सर्व शेतकऱ्यांच्या थकबाकीसाठी जबाबदार राहील. तसेच सागर राजपूत या व्यापारावर कारवाई करण्यात येईल असे आश्वासनही त्यांनी दिले.

सध्या आचारसंहिता लागू असल्यामुळे थोडा विलंब होऊ शकतो, मात्र २५ नोव्हेंबरपर्यंत पैसे मिळाले नाहीत तर उग्र आंदोलनाचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## पक्षी सप्ताहानिमित्त संजीवन पर्यावरण संस्थेचे पक्षी निरीक्षण कार्यक्रम संपन्न



**मूल । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही ५ ते १२ सप्टेंबरदरम्यान पक्षी सप्ताह साजरा करण्यात आला, त्यानिमित्ताने संजीवन पर्यावरण संस्थेच्या वतीने १२ सप्टेंबर रोजी स्थानिक पक्षी निरीक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पक्षी निरीक्षणासाठी जानाळा येथील जंगलाची निवड करण्यात आली होती, ज्यामध्ये स्थानिक २३ पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली. यामध्ये मोर, होला, रानभाई, टोई पोपटी, रानकोंबडी, खंड्या, हुदहुद, साळुंकी, भारद्वाज, नीलकंठ, बगळा, कोतवाल, टीटवी, हळद्या आदी पक्ष्यांचा समावेश होता. कार्यक्रमावेळी संजीवन पर्यावरण संस्थेचे उमेशसिंह झिरे, प्रशांत मुत्यारपवार, प्रभाकर धोटे, स्वप्नील आक्केवार, अंकुश वाणी, प्रतीक लेनगुरे, हौशीक मंगर, तन्मय उराडे आणि आदित्य दहिवले उपस्थित होते

# गांधीनगर ब्रम्हपुरी येथील महिलांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

### युवा नेत्या शिवानी वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश



**ब्रम्हपुरी । प्रतिनिधी**

ब्रम्हपुरी तालुक्यात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या विकासाचा झंजावात व काँग्रेस पक्षाच्या विचार सरणीला प्रेरित होऊन ब्रम्हपुरी शहरांतील गांधीनगर प्रभागातील अनेक महिला कार्यकर्त्यांनी आज विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांचे नेतृत्वात प्रदेश युवक काँग्रेस सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. निवडणुकीच्या तोंडावर पार पडलेल्या ब्रम्हपुरीतील महिलांचा पक्षप्रवेशाने काँग्रेस पक्षाला अधिक बळ मिळाल्याचे मत यावेळी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार यांनी व्यक्त केले.

गेल्या १० वर्षापासून राज्याचे विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी क्षेत्र विकासासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून कोट्यावधींचा विकास निधी खेचून आणला. तद्वतच संपुर्ण क्षेत्रांतील सर्व समाजाला समान न्याय, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, अनेक सामजिक कार्य यासह अत्यावश्यक मूलभूत गरजा पुर्ण करुन नागरिकांच्या अडचणी दूर केल्या.अशा विविध कार्यांना प्रेरित होऊन ब्रम्हपुरी शहरातील सुप्रिया बनसोड, करिष्मा बारसगडे, पंचशीला बारसागडे ,संगीता गराडे ,पिंकी गराडे, कोमल मेश्राम, दीपक भशाखेत्रे, दिपाली बोरकर, श्रेया बागडे, सुनिता बागडे, स्नेहलता कोरवते,निकिता नंदनवार, राधिका नागपुरे ,प्रियंका कांबळे, दर्शना रामटेके, निर्मला रामटेके, वनमाला शेंडे, राईबाई भशाखेत्रे, देवळाबाई भानारकर ,सिंधू गराडे, यांचा सह अनेक महिलांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार यांनी पक्षात प्रवेश घेणाऱ्या सर्व महिलांचे दुपट्टा टाकून स्वागत केले.

# खुलताबादला चोवीस तास पाणीपुरवठा करण्याचं डॉ.सुरेश सोनवणे यांचं आश्वासन




**गंगापूर । प्रतिनिधी**

खुलताबाद शहरातील पाण्याच्या तुटवड्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, शहराच्या विकासाची स्थितीही अत्यंत दयनीय आहे. या मुद्द्यावर अपक्ष उमेदवार डॉ. सुरेश सोनवणे यांनी खुलताबादमधील मतदारांशी संवाद साधताना, विद्यमान आमदार प्रशांत बंब यांनी विकासाच्या नावाखाली फक्त दिशाभूल केल्याचा आरोप केला आहे.

गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये असलेली दुर्दशा पहाता, गेल्या पंधरा वर्षांत स्थानिक विकास कामांसाठी कोणतेही ठोस प्रयत्न झालेले नाहीत, असा आरोप सोनवणे यांनी केला.

### गुलमंडी परिसरात मतदार भेट दौरा

**खुलताबाद येथील गुलमंडी परिसरातील डॉ. सोनवणे यांच्या संपर्क कार्यालयापासून भद्रा मारुती मंदिरापर्यंत पायी रॅली काढून त्यांनी मतदारांच्या समस्या जाणून घेतल्या. या रॅलीला मोठ्या संख्येने महिला, पुरुष, तसेच तरुण वर्गाचा सहभाग दिसून आला.**

या निवडणुकीत भूमिपुत्राची लढाई प्रस्थापितांशी आहे, आणि मला विश्वास आहे की, या लढाईत मी नक्कीच विजयी होईन. मागील पंधरा वर्षांपासून रखडलेल्या सर्व विकास कामांना पुढील पाच वर्षांत मार्गी लावण्याचा माझा दृढ मानस आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.संपर्क दौऱ्यात सहभागी झालेल्या महिलांसह तरुण आणि वयोवृद्धांनी दिलेल्या उस्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त करत, डॉ. सोनवणे म्हणाले, या निवडणुकीत सामान्य मतदारांचा संपूर्ण विश्वास मला लाभला आहे. परिवर्तन अटळ आहे, आणि या वेळी 'पान' चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करून तुमची सेवा करण्याची संधी द्या, असे आवाहन त्यांनी गुलमंडी येथे आयोजित संवाद दौऱ्यादरम्यान केले.

# मतदान पथकातील १५०० कर्मचा-यांचे प्रशिक्षण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतांनाच जिल्हा प्रशासनाची तयारी सुद्धा अंतिम टप्प्यात आहे. प्रशासन मतदानासाठी सज्ज असून प्रत्येक बारीक सारीक गोष्टींचे सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. निवडणूक प्रक्रियेमध्ये कोणतीही चूक होऊ नये म्हणून मतदान पथकाला सर्व बाबींचे प्रशिक्षण दिले जाते. याच अनुषंगाने जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या उपस्थितीत चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील मतदान पथकामध्ये असलेल्या १५०० कर्मचा-यांचे प्रशिक्षण शहरातील बीजेएम कार्मेल अकादमी येथे पार पडले. कर्मचा-यांना मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर आवश्यक असलेले सर्व नमुने व्यवस्थित व काळजीपूर्वक भरून घ्यावे. तसेच उमेदवारांच्या मतांची आकडेवारी असणाला १७ – सी नमुना उमेदवारांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून द्यावा. सर्वांनी मॉकपोल व्यवस्थितपणे करणे गरजेचे आहे. मतदानाची आकडेवारी अतिशय गांभिर्याचे व अचूक पध्दतीने भरावी. यात कोणतीही चूक होऊ देऊ नका. आपल्या मनातील सर्व शंकांचे प्रशिक्षणात समाधान करून घ्यावे. काही अडचणी असल्यास तिसरे प्रशिक्षण १९ नोव्हेंबर रोजी होणार आहे, तेथे विचारून घ्याव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या. यावेळी त्यांनी पोस्टल बॅलेट सुविधा केंद्राची सुद्धा पाहणी केली.



प्रशिक्षणाला चंद्रपूरचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय पवार, सहायक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार विजय पवार, रविंद्र भेलावे, मनुष्यबळ व्यवस्थापनाचे नोडल अधिकारी अनिकेत माने, नायब तहसीलदार राजू धांडे, सचिन खंडाळे यांच्यासह १५०० कर्मचारी उपस्थित होते.

## सोमराज कावळे यांची भारतीय जनता पक्ष शिर्डी शहराच्या सरचिटणीस पदावर निवड



**शिर्डी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या शिर्डी शहर शाखेच्या सरचिटणीस पदावर सोमराज भिवसेनराव कावळे यांची निवड करण्यात आली आहे. कावळे हे भाजप युवा मोर्चाचे माजी जिल्हा सरचिटणीस असून त्यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत पक्षाच्या शिर्डी शहर अध्यक्ष सचिन शिंदे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. या प्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर आबा गोंदकर, माजी नगराध्यक्ष शिवाजी गोंदकर, माजी विश्वस्त साईबाबा संस्थान सचिन तांबे, शहर उपाध्यक्ष सुधीर शिंदे, तसेच पंडित जी गुडे, रवी सोनवणे, अमोल बडे, रवी जायभये आणि किरण बोराडे आदी मान्यवरांनी कावळे यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .